# मनोगत

ज्ञानप्रबोधिनीच्या संस्कृत संस्कृती संशोधिकेचा प्रारंभ पुण्यातील ज्येष्ठ प्राध्यापक कै. कृ. श्री. अर्जुनवाडकर ह्यांनी १९७५ मध्ये केला. ज्ञान प्रबोधिनीचे आद्य संचालक कै. वाचस्पती वि. वि. पेंडसे तथा अप्पा ह्यांचा आणि प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर ह्यांचा अनेक वर्षांचा परिचय होता. संस्कृतसाहित्याविषयी उत्सुकता असूनही ज्यांना विविध कारणांमुळे तो अभ्यास मनाजोगता करता आला नाही अश्या प्रौढ स्त्रीपुरुषांसाठी अर्जुनवाडकरांनी ज्ञान प्रबोधिनीत वर्ग सुरू केले. ते स्वतः आणि त्यांच्या सुविद्य पत्नी कै. सौ. लीलाताई हे दोघेही त्या वर्गांमध्ये मार्गदर्शन करीत होते. त्याचप्रमाणे संस्कृतशी निकट असा भाषिक आणि ऐतिहासिक संबंध असणाऱ्या प्राचीन इराणी भाषेतील अवेस्ताचे अध्ययन करणे आणि त्याद्वारे प्राचीन भारतीय आणि प्राचीन इराणी ह्यांच्यातील सांस्कृतिक संबंधांचे ज्ञान करून घेणे ह्या उद्देशाने आणखी एक वर्ग प्रा. अर्जुनवाडकरांनी सुरू केला होता आणि त्यासाठी वा. मेहेंदळे हे प्रसिद्ध विद्वान मार्गदर्शन करीत होते. मी त्यावेळी ज्ञान प्रबोधिनीच्या प्रशाळेत अध्यापनाचे काम करीत होतो आणि त्याजोडीने श्रीअरविंदांच्या साहित्याचा अभ्यास करीत होतो. तसेच पारंपारिक पद्धतीने संस्कृत व्याकरण शिकणाऱ्या आणि शिकवणाऱ्या लोकांची संख्या झपाट्याने कमी होत असल्याने त्यासंदर्भात एका प्रकल्पाचेही काम मी करत होतो. त्याकाळी पुण्यात भागवतगुरुजी ह्या नावाने प्रसिद्ध असे संस्कृत व्याकरणाचा पारंपरिक पद्धतीने अभ्यास केलेले विद्वान टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संस्कृत व्याकरणाचे अध्यापन करीत होते. संस्कृत व्याकरणावरील एक प्रसिद्ध ग्रंथ सिद्धांतकौमुदी ह्यावर भागवत गुरुजींनी केलेले विवेचन आणि अधूनमधून मी विचारलेले प्रश्न ध्वनिमुद्रित करणे असे त्या प्रकल्पाचे स्वरूप होते. प्रत्येकी दीड तासाच्या अश्या सुमारे साडेतीनशे ध्वनिमुद्रिका आम्ही तयार केल्या आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात त्या विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील अशी व्यवस्था केली. त्या निमित्ताने मला पाणिनी ह्या संस्कृत व्याकरणकाराच्या अलौकिक बुद्धिमत्तेचा परिचय झाला. प्रा. अर्जुनवाडकरांचे एक स्नेही कै. प्रा. स. ह. देशपांडे हे हिंदुत्व ह्या विषयावर प्रदीर्घ काळ सूक्ष्म चिंतन केलेले विद्वान त्या काळात राष्ट्रवाद अभ्यास मंडळ ह्या नावाने एक उपक्रम ज्ञान प्रबोधिनीत घेत होते.

त्या बैठकींमध्ये होणाऱ्या चर्चांचा मला खूप लाभ झाला. अश्या प्रकारे माझे वैचारिक जीवन समृद्ध होण्याच्या कामात संत्रिकेचा खूप मोठा भाग आहे. त्यासाठी मी कै.अर्जुनवाडकर पतिपत्नी, कै. भागवतगुरुजी कै. स. ह. देशपांडे आणि त्यांचे सहकारी श्री. अरविंद बाळ ह्या सर्वांचा अत्यंत ऋणी आहे. ह्या सर्व वैचारिक प्रवासात एक गोष्ट मात्र मला वेदनादायक वाटत असे. ती म्हणजे संस्कृतच्या अध्ययनाच्या क्षेत्रावर भारतीयांपेक्षा विदेशी अभ्यासकांचा आणि संशोधकांचा असणारा प्रभाव. वेदांचा अभ्यास करताना मॅक्सम्यूलर, ओल्डेनबर्ग, हिलेब्रांट इ. विदेशी संशोधकांचा उल्लेख भारतीय संशोधकांच्या तुलनेत कितीतरी पटीने अधिक प्रमाणात होत असे. अधूनमधून सायणाचार्यांचा उल्लेख होत असे. मात्र स्वामी दयानंद, श्रीअरविंद ह्यांच्या भाष्यासंबंधी मला महाविद्यालयात किंवा पुणे विद्यापीठात कधीही प्राध्यापकांकडून काही ऐकायला मिळाले नाही. ही उणीव संत्रिकेत भरून काढण्याचा प्रयत्न मी काही प्रमाणात केला. संत्रिकेतील भावी अभ्यासकांनी आणि संशोधकांनी ह्याचा विचार करून अभ्यास आणि संशोधन करावे अशी माझी इच्छा आणि विनंती आहे. मा. यशवंतरावांनी संत्रिकेतील धर्मविषयक कामात खूप मोठे योगदान दिले आहे. त्या कार्याची परंपरा पुढे चालवण्याची संधी मला मिळाली ह्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. संत्रिकेतून तयार झालेले पुरोहित आता देशविदेशात प्रत्यक्ष जाऊन अथवा दूरस्थ (online) पद्धतीने पौरोहित्य करत आहेत. पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या पौरोहित्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने होणाऱ्या ह्या पौरोहित्यपद्धतीचे स्वागत समाजाने मोठ्या प्रमाणात केले आहे. माझ्या नंतर मनीषा ताई त्या कामाची जबाबदारी सांभाळत आहेत. पौरोहित्याचा, राष्ट्रवादाचा तसेच भारतीय आध्यात्मिक परंपरेचा अभ्यास आणि संशोधन ह्यासंदर्भात संत्रिकेत आत्तापर्यंत झालेले काम अधिक मोठ्या प्रमाणात पुढे वाढावे ह्यासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा!